मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
**मराठी भाषा विभाग**
# राज्य मराठी विकास संस्था
**एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,**
**धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६**
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in
इ-पत्ता **rmvs_mumbai@yahoo.com** , project3.rmvs@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र.रामविसं/मयुमं/प्र.क्र.२३/प्रकल्प ३/२२३ /२०२४
दिनांक: २९ फेब्रुवारी २०२४

प्रति,
संचालक,
माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
एनएक्स इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

विषय:- महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर ‘मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे’. या उपक्रमाचा दुवा प्रसारित करण्याबाबत.

महोदय/महोदया,

मराठी भाषा विभागामार्फत दि. १३.०७.२०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासननिर्णयान्वये राज्य मराठी विकास संस्थेतर्फे सन २०२४ पासून मराठीचा प्रचार-प्रसार करण्यासाठी ‘मराठी भाषा युवक मंडळे’ हा उपक्रम कार्यान्वित करण्यात येत आहे.

या उपक्रमाची माहिती जास्तीत जास्त मंडळांपर्यत पोहोचावी यासाठी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर, या उपक्रमासाठी तयार करण्यात आलेला गुगल अर्जाचा दुवा https://forms.gle/aUsgMPm4a9AbSBo3A उपलब्ध करून देण्यात यावा. तरी इच्छुकांना सदर गुगल अर्जावर आपली माहिती भरण्यासाठी मराठी भाषा युवक मंडळांना आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या अधिकृत संकेतस्थळावर नवीन संदेश या सदरात ‘मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे’ या शीर्षकाखाली सरकत्या ओळीत दुवा प्रसारित करावा. आपल्या पुढील कार्यवाहीसाठी सदर उपक्रमाचा मजकूर सोबत जोडला आहे

कृपया या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही कारावी, ही विनंती.

आपला,
(गिरीश पतके)
कार्यासन अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी (अ.का.)

सहपत्र – वरीलप्रमाणे
माहितीसाठी प्रत -
कार्यासन अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**मराठी भाषा विभाग**
**राज्य मराठी विकास संस्था**
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in
इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com , project3.rmvs@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## "मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे" सन २०२४

महाराष्ट्र शासनाच्या ध्येयधोरणानुसार मराठीचा प्रचार-प्रसार करण्यासाठी मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर परंतु देशातंर्गत मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे व या उपक्रमांतर्गत, निश्चित केलेल्या विहित कार्यपद्धती व निकषांना अनुसरून मान्यता प्राप्त मराठी भाषा युवक मंडळांतून निवड झालेल्या प्रत्येक पात्र मंडळाला वार्षिक रु. १०,०००/- इतके अनुदान सहाय्य करण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी दिनांक ०१ /०३/ २०२४ ते १५/०३/२०२४ या कालावधीत, विहित नमुन्यात गुगल अर्जाद्वारे **(Google Form)** देशातील मराठी भाषा युवक मंडळांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

या उपक्रमासाठी तयार करण्यात आलेला गुगल अर्जाचा दुवा https://forms.gle/aUsgMPm4a9AbSBo3A उपलब्ध करून देण्यात यावा.

नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

मराठी भाषा विभाग

# राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई – ४००००१.
दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५/२२६५३९६६. संकेतस्थळ : https://rmvs.marathi.gov.in
ई-पत्ता : project3.rmvs@gmail.com

## मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे
## सन २०२३-२४

महाराष्ट्र शासनाच्या ध्येयधोरणानुसार मराठीचा प्रचार-प्रसार करण्यासाठी मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर परंतु देशांतर्गत **मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे** व या उपक्रमांतर्गत, निश्चित केलेल्या विहित कार्यपद्धतीत व निकषांना अनुसरून मान्यताप्राप्त मराठी भाषा युवक मंडळांतून निवड झालेल्या प्रत्येक पात्र मंडळाला वार्षिक रु. १०,०००/- इतके अनुदान सहाय्य करण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी दिनांक ०१.०३.२०२४ ते १५.०३.२०२४ या कालावधीत, विहित नमुन्यात गुगल अर्जाद्वारे (Google Form) देशातील मराठी भाषा युवक मंडळांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

याबाबतची अधिक माहिती तसेच, या उपक्रमाची कार्यपद्धती व निकष, मार्गदर्शक सूचना, विहित गुगल अर्ज राज्य मराठी विकास संस्थेच्या **https://rmvs.marathi.gov.in** या तसेच महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या अधिकृत संकेतस्थळावर **मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे** या शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(डॉ. शामकांत देवरे)
संचालक
राज्य मराठी विकास संस्था

**8X11**